# नावीन्यपूर्ण उत्पादनातून बाथ फिटिंग उद्योगाला दिशा

## जॅक्वारची 'मेक इन इंडिया'तून परवडणारी उत्पादने

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. २७ : काळानुरूप ग्राहक बाथरूम सजावट आणि सुविधांबाबत चोखंदळ बनला आहे. नवी वास्तू खरेदी करताना त्यातील सोईसुविधा विशेषत: बेडरूम, किचनप्रमाणेच बाथरूममधील सजावटीला ग्राहक झुकते माप देत आहे. त्यामुळेच बाथरूम फिटिंग उद्योग तेजीत आहे. नजीकच्या काळात ग्राहकांची आवडनिवड आणि तंत्रज्ञानाचा वापर केलेली नावीन्यपूर्ण उत्पादने बाथरूम फिटिंग उद्योगाची परिभाषा बदलतील, असे मत बाथ फिंटिंग आणि सोल्युशन्स पुरवठादार असलेल्या जॅक्वारचे संचालक विश्वास मेहरा यांनी व्यक्त केले.



प्रत्येक व्यक्तीसाठी बाथरूम हे ताणतणाव दूर करण्याचे महत्त्वाचे ठिकाण आहे. येथून तणावमुक्ती तर मिळतेच त्याचबरोबर नवी ऊर्जा, उत्साह मिळतो. त्यामुळे बाथरूममधील सजावट दैनंदिन जीवनशैलीतील अविभाज्य घटक बनली आहे. नावीन्यपूर्ण उत्पादने आणि ॲक्सेसरीजमधून बाथरूममधील स्नानाचा अनुभव आरामदायक आणि आल्हाददायक बनविण्याचे कंपनीचे उद्दिष्ट असल्याचे मेहरा यांनी सांगितले. पाच दशकांच्या काळात उच्च श्रेणीतील बाथ फिटिंग उत्पादनांसाठी जॅक्वार ओळखली जात होती; मात्र उच्च श्रेणीतील ग्राहकांबरोबरच निमशहरी अथवा ग्रामीण भागातील ग्राहकही आधुनिक बाथरूमबाबत आग्रही आहेत. सामान्य ग्राहकांसाठी कंपनीने 'इस्को' या ब्रँडला विकसित केल्याचे त्यांनी सांगितले.

**स्मार्ट सिटी, 'परवडणारी घरे' या योजनांमुळे बांधकाम क्षेत्रातील मंदी सरेल. नजीकच्या काळात बाथ फिटिंग उत्पादनांची मागणी वाढेल.**
**-विश्वास मेहरा, संचालक जॅक्वार.**

'मेक इन इंडिया'ला अनुसरून जॅक्वारने बाथरूममधील अविभाज्य घटक असलेले नळ, शॉवर्समध्ये नव्या तंत्रज्ञानाबरोबर डिजाईन्सवर भर दिला आहे. कंपनीकडून प्रीमियम उत्पादनांबरोबरच मध्यम आणि एन्ट्री लेव्हल उत्पादनांची नवीन श्रेणी तयार केल्याची माहिती त्यांनी दिली. ग्राहकांना जागतिक दर्जाचे शॉवर्स सोल्युशन्स देण्यासाठी जॅक्वारने नुकताच जगातील आघाडीचे शॉवर्स उत्पादक जॉयफॉरलाईफवर ताबा मिळविला. भारतीयांच्या गरजा आणि पाण्याची उपलब्धता यांचा अभ्यास करून शॉवर्सनि विविध प्रकार तयार केल्याचे जॉयफॉरलाईफचे मुख्य कार्यकारी अधिकारी किहो हा यांनी सांगितले.